MHLA090007522021

## नियमीत दिवाणी दावा क्र.१२५/२०२१ मधील
## प्रदिप मोरे वि. बाळासाहेब मोरे व इतर
## निशाणी क्र.२२ वर आदेश

सदरचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिताचे आदेश २६ नियम ९ प्रमाणे न्यायालयीन आयुक्त म्हणून उपअधिक्षक, भुमि अभिलेख, उदगीर यांची नेमणूक करुन मालमत्ता गट क्र.८७ व गट क्र.९३ मौजे उमरगा (मन्ना), ता. उदगीर येथील जमीनीची मोजणी करुन, प्रतिवादींमार्फत झालेले अतिक्रमीत क्षेत्र दाखवून त्याप्रमाणे मोजणी नकाशा व अहवाल न्यायालयात सादर करण्याकरीता प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२. सदर अर्जातील वादीचे कथन थोडक्यात असे आहे की, तो शेत गट क्र.८७ व ९३ चा मालक व कब्जेदार असून प्रतिवादींनी १२ गुंठे जमिनीवर अतिक्रमण केले आहे. प्रतिवादींनी वादीचा बांध फोडून अनधिकृतरित्या अतिक्रमण करुन जमीन काबीज केली आहे. वादीने त्यांना वारंवार विनंती करुन देखील त्यांनी अतिक्रमित क्षेत्र परत करण्याचे नाकारले आहे. तसेच, वाद जमिन मोजणी करुन घेण्याबद्दल देखील विनंती केली असता नाकारलेली आहे. प्रतिवादींनी वादीचा मालकी व ताबा देखील नाकारलेला आहे. वादीच्या कथनानुसार सदरील जमिनीची मोजणी केल्यास प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण अभिलेखावर येणार आहे.

३. वादी कथन करतो की, तो मोजणीचा सर्व खर्च उचलण्यास तयार आहेत. सदरची मोजणी झाल्यास प्रतिवादींनी केलेले अतिक्रमण न्यायालयाच्या निदर्शनास

येणार आहे. जे की, दाव्याच्या निकालाकरीता आवश्यक आहे. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

**४.** प्रतिवादींनी सदरील अर्जावर त्यांचे कुठलेही लेखी म्हणणे दिलेले नसल्याने प्रस्तुतचा अर्ज विना लेखी म्हणणे चालविण्यात आला. सबब, अर्ज व अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. वादीच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्जाच्या निर्णयाप्रत पोहोचण्याकरीता माझ्यापुढे पुढील मुद्दे उपस्थित होतात. त्याचे सकारण निष्कर्ष मी खालीलप्रमाणे नोंदवित आहे –

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दोन्ही पक्षकारातील वादग्रस्त बाब स्पष्ट करण्याकरीता न्यायालयीन आयुक्त म्हणून उप अधिक्षक भुमि अभिलेख, उदगीर यांची न्यायालयीन आयुक्त म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे काय ? | नाही. |
| २. | आदेश काय ? | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र.१ करीता</u>** :–

**५.** मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या **खंदारे विरुध्द खंदारे, २००१(१) ऑल एमआर ६५३** या प्रकरणात, न्यायालयीन आयुक्त पुरावे गोळा करण्याकरीता नेमला जात नाही असे सांगितलेले आहे. तसेच, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद, यांनी **कावडे विरुध्द कावडे, रिट पिटीशन क्र.३६००/२०१४** या प्रकरणात वरील प्रमाणेच न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक पुरावे गोळा करण्याकरीता केली जात नाही असे स्पष्ट केले आहे. वर दोन्ही न्यायनिर्णयांमध्ये न्यायालयीन आयुक्ताची नेमणूक कधी केली जात नाही असे स्पष्ट केले आहे. त्यामुळे, वरील दोन्हीं न्यायनिर्णय प्रस्तुतच्या प्रकरणात आदेश करताना विचारात घेतले जावू शकतात.

त्याचप्रमाणे, मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी विविध प्रकरणामध्ये असे निर्देशित केले आहे की, वादीने त्याचा पुरावा सादर न करता वादग्रस्त जमिनीची मोजणी करण्याकरीता न्यायालयीन आयुक्त नेमण्याचा अर्ज दाखल केल्यास सदरील अर्ज फेटाळून लावावा.

६. प्रस्तुतच्या प्रकरणात वादीने अद्याप पुरावा दिलेला नाही. प्रस्तुतचा दावा हा वादग्रस्त जमिनीची मालकी व ताबा घोषित होऊन मिळण्याकरीता दाखल करण्यात आलेला आहे. त्यामुळे वाद जमिनीची मालकी व ताबा सिध्द करण्याची जबाबदारी वादीवर आहे. त्यानंतर वादग्रस्त जमिनीवर प्रतिवादींमार्फत अतिक्रमण करण्यात आले आहे किंवा कसे हे सिध्द करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज वादी गरज पडल्यास पुढे देखील दाखल करु शकतो. वादीवर मालकी सिध्द करण्याची जबाबदारी असल्याने या प्रकरणात जर न्यायालयीन आयुक्त नेमला तर त्यामुळे वादीचा मालकी व ताबा अभिलेखावर येऊ शकतो. न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक ही पुरावा गोळा करण्यासाठी करण्यात येवू नये, याबाबत वर नमूद न्यायनिर्णयांमध्ये मा. उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

७. त्याचप्रमाणे, दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २६ नियम ९ नुसार न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक ही स्थानिक चौकशी करण्यासाठी तसेच एखाद्या मालमत्तेचे बाजारमुल्य निश्चित करण्यासाठी किंवा नुकसान भरपाईची चौकशी करण्यासाठी केली जाते. सदरचा अर्ज मंजूर करण्यासाठी न्यायालयाला त्याबद्दलची गरज का आहे याची कारणे द्यावी लागतात. त्यानंतरच न्यायालयीन आयुक्त नेमणुकीचा अर्ज मंजूर केला जातो. वरील कारणांवरुन वादीने सर्वप्रथम त्याची मालकी व ताबा सिध्द करायचा आहे. आज घडीला प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याचे कुठलेही कारण वादीकडे नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे.

८. या प्रकरणामध्ये न्यायालयीन आयुक्ताची नेमणुक केल्यास वादीची मालकी तसेच ताब्याबाबत पुरावा निर्माण होईल. ज्यामुळे प्रतिवादींचे नुकसान होवू शकते. सबब, मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवितो.

**मद्दा क्र.२ करीता** –

**९.** मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविल्याने प्रस्तुतचा अर्ज नामंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मद्दा क्र.२ करीता मी पुढील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे–

## आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज नामंजूर करण्यात येतो. |
| २. | खर्चाबाबत आदेश नाही. |

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित).

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by CHAVAN NIKHIL JEEVANRAO
Date: 2025.03.15 17:51:53 +0530

उदगीर **(एन.जे. चव्हाण)**

दि.१५/०३/२०२५ ३रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर